REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये संरक्षण यंत्रणेचा वापर—एक अध्ययन

डॉ. राजेश शंकरराव पत्तीवार
सहाय्यक प्राध्यापक, जनता शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर.

*गोषवारा —*

*व्यक्तीच्या जीवनातील एक महत्वाचा कालखंड म्हणून कौमार्यावस्था आहे. अनेक लक्षणिय बदल घडून येतात. शारिरीक, मानसिक, भावनिक, जैविक अशा अनेक बदलामूळे तो आमुलाग्र बदलतो. अशा काळात शिक्षक आणि पालकांची जबाबदारी वाढते व योग्य दिशा व मार्गदर्शन करण्याची भासते. त्याच काळात तो संरक्षण यंत्रणेचा जास्त वापर करण्यास सुरू करतो. त्यामुळे या कालखंडातील मुले कोणत्या संरक्षण यंत्रणेचा वापर अधिक प्रमाणात करतात, त्याचे फायदे नुकसान कोणते ? त्यास मार्गदर्शन कसे करावयाचे ? हे या विषयाच्या अभ्यासाने कळते.*

*कळ शब्द :— कौमार्यावस्था, संरक्षण यंत्रणा,*

## प्रस्तावना —

वादळी अशांततेचा काळ म्हणून संबोधला जाणारा 13 ते 19 वर्ष हा कालखंड विद्यार्थ्याच्या आयुष्यातील महत्वाचा असा कालखंड आहे. या वयातील विद्यार्थी अतिशय चंचल असतो. शारिरीक, मानसिक, आणि भावनिक बदल त्यांच्या मध्ये झपाटयाने होत असतो. किशोरावस्थेत एकत्र खेळणारे मुले व मुली हळुहळु एकमेकांपासून दूर राहायला लागतात. भिन्न लिंगी आकर्षण वाढु लागते. या वयातील विद्यार्थी बौध्दीकदृष्ट्या सक्षम होत असतो. चांगल्या वाईटाची जाणीव आपल्याला आहे असे त्याला वाटते. त्यांना प्रौढांचे स्वातंत्र्य हवे असते. परंतु ते न मिळता त्यांच्या कडून नेहमी उपदेश ऐकावा लागतो. आपले आदर्श ठरविण्याचा हा कालखंड. समाजातील उच्च पदावरील व्यक्ती त्याचे आदर्श बनतात. आपणही त्याच्या सारखे व्हावे, त्याच्या सारखे वागावे असे त्यांना वाटत असते. या वयातील विद्यार्थी स्वप्नाळू असतात. ते आपले स्वप्न व इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतात. पण अशी सर्वच इच्छा पूर्ण होतीलच असे नाही. अश्या वेळी त्यांना तडजोड करावी लागते कारण समायोजन हा निसर्गाचा नियम आहे. तसेच ती आयुष्याची आवश्यक गरज देखील आहे. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये समायोजन क्षमतेचा विकास करणे महत्वाचे आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये आपल्या आकांक्षा इच्छा व स्वप्ने पूर्ण करण्याची योग्यता असतेच असे नाही. कारण प्रत्येकाची शारीरिक आणि मानसिक क्षमता ही वेगवेगळी असते. परंतु व्यक्ती आपली स्वप्ने आणि आकांक्षा त्यानुसार ठरवित नाही. जेव्हा या मध्ये असंतुलन तयार होते तेव्हा ती व्यक्ती किंवा विद्यार्थी निराश होते त्याचे मानसिक आरोग्य बिघडते. परिणामी नैराश्याच्या गर्तेत लोटला जातो. त्यातुन मार्ग काढण्याच्या प्रक्रियेत तो निरनिराळ्या संरक्षण यंत्रणांचा वापर करतो. अपयश पचविण्याची क्षमता कमी असल्याकारणाने इच्छा पूर्ण व्हावयासच पाहिजे या अट्टहासापायी विद्यार्थी खोटे बोलणे, शाळेत गैरहजर असणे, इतरांशी वैरत्व वाढविणे, याची परिसिमा गाठल्यानंतर आत्महत्या करणे अश्या गोष्टीच्या आहारी जातात.



संरक्षण यंत्रणा अश्या युक्ती आहेत की, ज्या व्दारे आंतरीक संघर्षांना समाप्त केले जाते किंवा त्याची तीव्रता कमी केली जाते.

या मध्ये व्यक्ती बाह्य समस्या किंवा धोका अथवा चिंता या पासून वाचण्यासाठी अशी प्रक्रिया वापरतो की, ज्यामध्ये वास्तविक परिस्थितीला खोटे पाडतो. व स्वतःला धोका देत आलेल्या परिस्थितीला समोरे जात असतो. जीवनात येणाऱ्या समस्यांना सहनकरण्याकरिता या ढालीचा उपयोग शोषक म्हणून करतो. त्यामूळे मनावरील ताण कमी होतो आणि परिस्थितीशी समायोजन करीत असतो. काही प्रमाणात मानसिक संतुलन साधण्यासाठी हे उपयुक्त आहेत. मात्र त्याचा अतिरेक झाल्यास गंभीर स्वरूपाची मानसिक विकृती होण्याची शक्यता असते. असे होऊ नये यासाठी मनाची तयारी करणे आवश्यक ठरते. म्हणून विद्यार्थ्यांना जीवनातील कठोर वास्तवतेची जाणीव करून द्यावी तरच ही मूले जीवनातील वादळी अशांततेच्या काळात यशस्वीपणे तोंड देतील.

## संशोधनाची आवश्यकता –

कौमार्यावस्थेत जे शारीरिक व जैविक बदल घडून येतात त्यामुळे या वयातील विद्यार्थी गोंधळून जातात. परलिंगी आकर्षणामूळे त्यांच्यात चिंता निर्माण होते. यात काहीही अनैसर्गिक नाही हे त्यांना समजावून सांगणे आवश्यक असते. मुलांना त्यांचा मान दिलाच पाहिजे. तरच ते विधायक कार्य करतात. त्यांना आपल्या व्यक्तीमत्वाची जाणीव होऊ लागलेली असते त्यावेळी त्याची योग्य दखल घेणे आवश्यक असते. या सर्व परिस्थितीत योग्य समायोजन साधले जात असतांना विद्यार्थी कोणकोणत्या संरक्षण यंत्रणेचा वापर करतो ? संरक्षण यंत्रणेचा वापर कां करतो.?, त्याचे परिणाम कसे होतात. ? इत्यादी गोष्टी जाणून घेवून त्यांना योग्य मार्ग दाखविणे हे शिक्षकांचे तसेच पालकांचे कर्तव्य ठरते त्याकरिता संरक्षण यंत्रणेच्या वापराचे माहिती शिक्षकांना तसेच पालकांना असावी व त्याचा उपयोग आपल्या पाल्याला व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासासाठी व्हावा या हेतूने या विषयी संशोधन करण्यासाठी हा विषय निवडला गेला.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये –

1) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांमधील संरक्षण यंत्रणा अभ्यासणे.
2) कौमार्यावस्थेतील विद्यार्थीनींमधील संरक्षण यंत्रणा अभ्यासणे.
3) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यां व विद्यार्थीनींमधील संरक्षण यंत्रणेतील सहसंबंध अभ्यासणे.

## परिकल्पना –

कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यां व विद्यार्थीनींमधील संरक्षण यंत्रणेच्या वापरामध्ये सार्थक फरक नाही.

## संशोधनाचे परिक्षेत्र, व्याप्ती व मर्यादा –

प्रस्तुत संशोधनाचे परिक्षेत्र हे चंद्रपूर तालुका असून त्याची व्याप्ती चंद्रपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांपुरते आहे. प्रस्तुत संशोधन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या संरक्षण यंत्रणेच्या वापरापूरते मर्यादित आहे.

## संशोधनाची पध्दती –

प्रस्तुत संशोधनाकरिता सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला.

## जनसंख्या –

प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थी संशोधनासाठी जनसंख्या आहे.

## न्यादर्श –

प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील इयत्ता 9 व 11 वी च्या 50 मुले व 50 मुलींची (एकूण 100) विद्यार्थ्यांची यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने निवड करण्यात आली.

## संशोधनाची साधने –

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलित करण्याकरिता संशोधकाने डॉ. एन. आर. म्रिणाल व डॉ. उमा सिंघल यांची Defence Mechanism Inventory या मापिकेचा वापर करण्यात आला. या मापणीत 10 घटना दिलेल्या असून प्रत्येक घटनेसाठी 20 असे 200 प्रश्न दिलेले आहेत. त्या चार प्रतिक्रिया म्हणजे वास्तविक, कल्पित, विचार, आणि भावना होय. या मापिकेत पाच प्रकारच्या संरक्षणांचा समावेश केलेला आहे. त्या TAO इतरांबद्दल विरोध दर्शविणे, PRO प्रक्षेपण, PRN तात्वीकरण, TAs स्वतःबद्दल विरोध, RVE परिवर्तन या आहेत.

## माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण व अर्थ निर्वचन –

प्रस्तूत संशोधनासाठी न्यादर्शातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करून त्या माहितीचे वर्गिकरण करण्यात आले. वर्गिकृत माहिती संख्याशास्त्रीय परिमाण मध्यांक, मध्यमान, प्रमाणविचलन, व क्रांतीक गुणोत्तर या संस्काराच्या आधारे मापणे काढण्यात आली व त्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

### कौमार्यावस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींमधील संरक्षण यंत्रणेच्या फरकातील सार्थकता स्तर दर्शविणारी सारणी

| Defence | | एकुण N | मध्यमान M | प्रमाण विचलन | "t" मुल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| TAO | Male | 50 | 34.6 | 7.83 | 9.84 | 0.01 व 0.05 स्तरावर सार्थक |
| | Female | 50 | 31.16 | 10.21 | | |
| PRO | Male | 50 | 39.52 | 4.82 | 15.33 | 0.01 व 0.05 स्तरावर सार्थक |
| | Female | 50 | 36.60 | 4.93 | | |
| PRN | Male | 50 | 43.12 | 3.88 | 5.28 | 0.01 व 0.05 स्तरावर सार्थक |
| | Female | 50 | 42.58 | 3.65 | | |
| TAs | Male | 50 | 38.45 | 4.20 | 5.25 | 0.01 व 0.05 स्तरावर सार्थक |
| | Female | 50 | 37.65 | 4.47 | | |
| RVE | Male | 50 | 42.46 | 3.92 | 16.54 | 0.01 व 0.05 स्तरावर सार्थक |
| | Female | 50 | 44.30 | 4.0 | | |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, TAO इतरांबद्दल विरोध, तादात्म्य आणि विस्थापन या यंत्रणांचा वापर करण्यात विद्यार्थी व विद्यार्थीनींमध्ये फरक दिसून येतो. यात विद्यार्थ्यांमध्ये या संरक्षण यंत्रणेच्या वापरण्याचे प्रमाण विचलन 7.83 आहे तर विद्यार्थीनींमध्ये 10.21 आहे. t मुल्य 9.84 असून 0.01 व 0.05 स्तरावर फरक सार्थक नाही.

PRO प्रक्षेपण, व नकारात्मक भावना या यंत्रणांचा वापर करण्यात विद्यार्थी व विद्यार्थीनींमध्ये अल्प फरक दिसून येतो. यात विद्यार्थ्यांमध्ये या संरक्षण यंत्रणेच्या वापरण्याचे प्रमाण विचलन 4.82 आहे तर विद्यार्थीनींमध्ये 4.93 आहे. t मुल्य 15.33 असून 0.01 व 0.05 स्तरावर फरक सार्थक नाही.

PRN तात्वीकरण, समर्थन, सामान्य तत्वाच्या भावनेतून संघर्ष करणे, या यंत्रणांचा वापर करण्यात विद्यार्थी व विद्यार्थीनींमध्ये अल्प फरक दिसून येतो. यात विद्यार्थ्यांमध्ये या संरक्षण यंत्रणेच्या

वापरण्याचे प्रमाण विचलन 3.88 आहे तर विद्यार्थ्यीनींमध्ये 3.65 आहे. t मुल्य 5.28 असून 0.01 व 0.05 स्तरावर फरक सार्थक नाही.

TAs स्वतःबद्दल विरोध दर्शविणे, दमन, स्वतःला दोषी ठरविणे या यंत्रणांचा वापर करण्यात विद्यार्थी व विद्यार्थ्यीनींमध्ये अल्प फरक दिसून येतो. यात विद्यार्थ्यांमध्ये या संरक्षण यंत्रणेच्या वापरण्याचे प्रमाण विचलन 4.20 आहे तर विद्यार्थ्यीनींमध्ये 4.47 आहे. t मुल्य 5.25 असून 0.01 व 0.05 स्तरावर फरक सार्थक नाही.

REV परागमन, परावर्तन, प्रतिकात्मक वृत्ती, दडपशाही या यंत्रणांचा वापर करण्यात विद्यार्थी व विद्यार्थ्यीनींमध्ये अल्प फरक दिसून येतो. यात विद्यार्थ्यांमध्ये या संरक्षण यंत्रणेच्या वापरण्याचे प्रमाण विचलन 3.92 आहे तर विद्यार्थ्यीनींमध्ये 4.0 आहे. t मुल्य 16.15 असून 0.01 व 0.05 स्तरावर फरक सार्थक नाही.

## संशोधनाचे निष्कर्ष –

1) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांची संरक्षण यंत्रणांचा वापर अभ्यासली असता प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्रतिसाद विविध घटकांकरिता वेगवेगळे आढळतात. मुलांमध्ये PRN या संरक्षण यंत्रणेचा वापर अधिक प्रमाणात केला जातो तर त्या खालोखाल REV, PRO, TEs, TAO, या यंत्रणेचा वापर मुले करतात.
2) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांनींची संरक्षण यंत्रणांचा वापर अभ्यासली असता प्रत्येक विद्यार्थ्यांनींचे प्रतिसाद विविध घटकांकरिता वेगवेगळे आढळतात. मुलांमध्ये REV या संरक्षण यंत्रणेचा वापर अधिक प्रमाणात केला जातो तर त्या खालोखाल PRN, TEs, PRO, TAO, या यंत्रणेचा वापर मुले करतात.
3) कौमार्यावस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यीनींची संरक्षण यंत्रणा वापरण्याची तुलना अभ्यासली असता, REV, TEs, PRO, TAO, या संरक्षण यंत्रणेचा वापर विद्यार्थी हे विद्यार्थीनींपेक्षा जास्त करतात.तर PRN हया संरक्षण यंत्रणेचा वापर विद्यार्थ्यीनी हया विद्यार्थ्यांपेक्षा जास्त करतांना आढळतात.

## संशोधनाची शैंक्षणिक उपयोगिता –

कौमार्यावस्था ही व्यक्तीच्या जीवनातील अत्यंत महत्वाची अवस्था आहे. या कालखंडावर त्याची पूढची जडणघडण अवलंबून असते. त्यामुळे या व अश्याप्रकारच्या संशोधनामुळे शिक्षक आणि पालकांना आपल्या पाल्यांच्या गरजा, व आवश्यकता माहित होतात तसेच शिक्षकांना देखील आपल्या विद्यार्थ्यांना कशाप्रकारे वागविले पाहिजे ? त्यांची आवश्यकता काय आहे ? त्या कशा प्रकारे पूर्ण करता येईल ? महत्वाचे म्हणजे त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करता येईल.

## संदर्भ :


**Garrett Henry E.** (1961) Statistics in Psychology and education, Paragon International Publishers, New Dehli

**Best, J.W.** (1992) : Research in Education, Prentice Hall of India Pvt. Ltd. New Dehli

भांडारकर पु. ल. (1987) : सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मीती मंडळ,

दांडेकर, वा.ना. (1992) : शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पूणे.

मुळे, रा.शं., आणि उमाठे वि.तु. (1998): शैक्षणिक संषोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र ग्रंथ निर्मीती मंडळ, नागपूर

दांडेकर, वा.ना. (2000) : शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पूणे

भटनागर, सुरेश., शर्मा अ.कु. (2016) : शिक्षण अधिगम एवं विकास के मनोविज्ञान का परिप्रेक्ष, आर. लाल बुक डेपो, मेरठ